# कोव्हिडच्या दिवसांतला प्रवास

आजोबा, आजी, आई, वडील, दहा महिन्यांचं बाळ व कुत्री झेडी. १५०० मैलाचा प्रवास, वेस्ट पाम बीच ते बॉस्टन. कसं जाणार?

विमानाचा मार्ग बंद. बाळाला मास्क कसा लावणार? रिक्रीएशनल व्हेईकल, आर. व्ही. हा उत्तम मार्ग. छोटं स्वयंपाकघर व बाथरूम बरोबर. बिऱ्हाड पाठीवर घेऊन प्रवास. असं ठरवलं. पण तो प्रयत्न अयशस्वी. 'वन वे' आर. व्ही. भाड्याने मिळत नाही. खाजगी विमान भाड्याने घेण्याची चौकशी. फारच महाग. शिवाय प्रवासात एअरपोर्ट टळत नाही. शेवटी मिनी व्हॅन भाड्याने घ्यायचं ठरलं. पब्लिक रेस्ट रूम्स धोक्याच्या. त्या कशा टाळायच्या ही चर्चा चालू झाली. (पब्लिक रेस्ट रूम्समध्ये टॉयलेट फ्लश झाल्यावर एरिसोलाईड ड्रॉप्लेट्स निर्माण होतात. ते श्वासोच्छ्वासातून गेले तर कोव्हिडचा संसर्ग होईल ही भीती.) कमीत कमी चार रात्री हॉटेल शोधणं भाग पडलं. आमच्या कुत्रीला घेईल असं हॉटेल. किचनेट हवी. प्रयत्नाने अशी हॉटेल्स मिळाली.

बरोबर ब्रेकफास्ट व लंचचे पदार्थ घेतले. बाळाच्या सामानाने व्हॅन भरली. पहिला थांबा ४ तासांवर सेंट ऑगस्टीन. रस्ता मोकळा, चटकन पोहचलो. रिसेप्शनिस्ट समोर प्लॅस्टिक पार्टीशन. खोलीच्या कड्या, नळ सगळं क्लोरॉक्सने साफ केलं. हॉटेलमध्ये काम करणारे सोडून कुणाच्याही तोंडावर मास्क नाही. रेस्टॉरंट, दुकाने प्रवाशांनी भरून वाहत आहेत. मास्क नाहीत. आम्ही मास्क लावलेला. आमच्या कडे विचित्र नजरेने सगळे पाहतात. डिनर बाहेरून आणलं. हॉटेलात सकाळी “टेक आऊट ब्रेकफास्ट” — एका पिशवीत एग सॅंडविचेस, ज्युस, फळं असं काही. खोलीत चहा कॉफी करायची व्यवस्था. बफेचे दिवस संपले.

दुसऱ्या दिवशी सात तासांचा प्रवास. एका बाजूच्या रस्त्याला ओढ्याकाठी बाथरूम ब्रेक. भारतीय पध्दत. तिथे डासांना मेजवानी.

पुढे एका पीच स्टॅण्डला थांबलो. मास्क नाहीत. ब्रॉझाविक, जॉर्जिया. तिथे विक्रेत्या बाईने सुचविलेल्या बागेत गेलो. तिथे पिकनिक टेबलवर लंच. बाजूला झाडी. आमच्या सोयीची. बागेतील बेसबॉल, बास्केट बॉल कोर्ट्स उजाड. सब जगह उदासी.

पुढचा थांबा फेयेटव्हील, नॉर्थ कॅरोलिनाला. हॉटेल पूर्वीच्या हॉटेलसारखंच. तिथे फोर्ट ब्रॅग हा मोठा आर्मी बेस. पुष्कळ आर्मीचे लोक हॉटेलात. सर्वांच्या तोंडावर मास्क. अगदी लहान मुलांच्या सुध्दा. बेसची लोकसंख्या ५७,०००च्या आसपास. त्यात घर, शाळा, दवाखाने. बेसमधून जाणारे सर्व रस्ते आम्हाला म्हणजे जनतेला बंद. परिणामी बेसला मोठ्ठी फेरी मारून हायवेला जावं लागलं. परत सात

तासांचं ड्रायव्हिंग. लंचला पार्क शोधत निघालो. एका रस्त्यावर बाहेर पडलो. वाटेत एक छोटी शाळा. आसपास झाडी. जवळ नदी. रोअनोक रिव्हर (Roanoke River). गावाचं नाव वेलडोन, नॉर्थ कॅरोलिना. लोकसंख्या १६५५.

नदी किनाऱ्याला डॉक, तिथे पाटी Rockfish Capitol of the world. मे महिन्यात तिथे पुष्कळ रॉकफिश असत. रॉकफिशची तिथे खूप माहिती लिहिलेली होती. सार कांही शांत होतं. तेव्हढ्यात दहा, बारा कार्स आल्या. त्यातून छोटी मुलं उतरली. हातात पाट्या. त्या वाचल्यावर कळलं; ती प्रोटेस्ट होती. एक फोटोग्राफर उगवला. त्याने फोटो काढले. दोन फेऱ्या मारल्यावर प्रोटेस्ट संपली. परत सारं कांही शांत. एका कोपऱ्यात एक जोडपं व्यायाम करत होतं. तेच फक्त उरले.

आता आम्ही न्यूयॉर्क, डेलावेरच्या वाटेवर. बाळ कंटाळलं. झेडी पण वैतागली. बाळ रडत, झेडी वळवळत. आम्ही डेलावेर, नेवार्कला पोहचलो. हॉटेल तसंच. ब्रेकफास्ट तोच. डेलावेरला सगळे मास्क लावून.

पुढचा थांबा ब्रूकलीनला. तिथे माझ्या मुलाचं अपार्टमेन्ट आहे. पण बिल्डिंगमध्ये, फ्लोरिडाचे प्रवासी, पाहुणे यांच्यापासून सगळे दूर पळणार! अपार्टमेंटमध्ये शिरल्यावर १४ दिवस पाय बाहेर ठेवायला बंदी. शेजारी पोलिसांना फोन करतात. ३००० डॉलर दंड होतो. म्हणून आम्ही अपार्टमेंटमध्ये रहायला गेलो नाही. एअर बी अँड बी तर्फे अपार्टमेंटजवळ छोटी बाग असलेलं घर भाड्याने घेतलं.

न्यू यॉर्कला सर्वांनी मास्क लावलेले. रेस्टॉरंटमध्ये बाहेर टेबलावर बसायला परवानगी. न्यू यॉर्कला मित्र मंडळींनी जेवण पोहचवलं.

तिथून पुढचा प्रवास सोपा, सुरळीत. सर्वांचे घराकडे डोळे लागलेले. मॅसाच्युसेट्समध्ये १४ दिवस quarantine.

हा प्रवास स्मरणीय झाला. छोटी शाळा, तिथली प्रोटेस्ट, रॉकफिश असणारी नदी, ह्या परिस्थितीत मास्क न लावता बेदरकारपणे हिंडणारी माणसं. सगळं काही जन्मभर माझ्या लक्षात राहील.

**ललिता गंडभीर**
lalitagandbhir@hotmail.com
(पूर्वप्रसिध्दी : रंगदीप २०२०)